डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर

अहवाल

# पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्मृतिदिन

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वासू कार्यकर्ते सहकारी पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या स्मृतिदिनाच्या अनुषंगाने दि. **२९ डिसेम्बर २०१७ ला** महाविध्यालयातील डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग तसेच पाली प्राकृत विभाग यांच्या संयुक्त विध्यमाने 'पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे सामाजिक कार्यातील योगदान' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. मोहन वानखडे होते तसेच प्रमुख उपस्थिती इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. शैलेश बहादुरे यांची होती. डॉ अविनाश फुलझेले यांनी अध्यक्षीय भाषण करताना दाद्साहेब गायकवाड हे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वासू कार्यकर्ते होते . त्यांनी बाबासाहेबांसोबत काळाराम मंदिराचे आंदोलन, महाडच्या चवदार तळयाचे आंदोलन, शेतकऱ्यांचे आंदोलन अश्या अनेक आंदोलनांची माहिती त्यांनी दिली. त्याचप्रमाणे प्रमुख वक्ते म्हणून डॉ. मोहन वानखेडे यांनी विध्यार्थ्यांना संबोधित करताना कार्यकर्त हा दादासाहेब गायकवाड यांच्या सारखा निर्माण व्हावा असे निक्षून सांगून अनेक उदाहरणे देऊन विध्यार्थ्यांचे प्रबोधन केले. याप्रसंगी डॉ शैलेश बहादुरे यांनी असे म्हटले कि, आजचा विध्यार्थी समाजकार्यापासून फार दूर चालला आहे.असे न करता विध्यार्थ्यानी सामाजिक दायीत्वाची भूमिका पार पडणे आवश्यक प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रासंच्यालन डॉ. आंबेडकर विचारधाराचे प्रा. राहुल मून यांनी केले तर आभार प्रा. शंकर चांदेकर यांनी केले. या कार्यक्रमात विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर
डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग आणि
पाली प्राकृत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने
कर्मविर दादासाहेब गायकवाड
यांचा
स्मृती दिन समारोह
२९ डिसेंबर








Report Concluded